मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.in » पुणे, पिंपरी-चिंचवड » शनिवार, दिनांक २३ डिसेंबर २०२३ । पान १


# डांगे चौकातील प्रकार; ऑइल गळती होऊन वीस दुचाकीस्वार घसरले

## प्रसंगावधानामुळे पुढील अनर्थ टळला



**वाकड**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।** थेरगाव, डांगे चौकातील ग्रेड सेप्रेटरमध्ये अज्ञात वाहनातून ऑइल गळती झाल्याने सुमारे वीस दुचाकीस्वार अपघातग्रस्त झाले. येथील थेरगाव सोशल फाउंडेशनच्या सदस्यांच्या समय सूचकतेमुळे पुढील अनेक वाहने अपघातग्रस्त होण्यापासून वाचली. गुरुवारी सायंकाळी सहाच्या सुमारास हा प्रकार घडला. ग्रेड सेपरेटरमध्ये ऑइल गळती झाल्याची माहिती काही सजग नागरिकांनी फाउंडेशनला कळवली. तेव्हा सायंकाळ झाल्याने अंधार पडू लागला होता. त्यामुळे वाहने घसरण्याचे प्रमाण आणखी वाढू नये, याची खबरदारी घेत वेळ न दवडता थेरगाव सोशल फाउंडेशनच्या सदस्यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. दुचाकीस्वार घसरून पडत असल्याने योग्य वाहतूक नियमन केल्याने पुढील अनर्थ टाळला. घसरून पडलेल्या दुचाकी स्वारांवर प्रथमोपचार करून तर काहींना दवाखान्यात नेले. घटनास्थळी दाखल झालेल्या अग्निशमन दलाच्या जवानांनी रस्ता धुवून, वाहतुकीसाठी पूर्ववत केला. घटनास्थळी वाकड वाहतूक पोलिस विभागाचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक सुनील पिंजण यांच्यासह वाहतूक पोलिस कर्मचारीदेखील दाखल झाले होते. थेरगाव सोशल फाउंडेशनचे अनिकेत प्रभू, चेतन पंडित, यश कुदळे, योगेश चितोडकर, रोहन गोडांबे, हिरा प्रजापती यांच्यासह स्थानिक नागरिकांनी वाहतूक नियमन करीत पुढील अपघात टाळण्यासाठी मदत केली.

# पालिका तिजोरीत १५२ कोटींचा ‘गल्ला’

## राज्य सरकारच्या ऐतिहासिक निर्णयाची यशस्वी वर्षपूर्ती





**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।** पिंपरी-चिंचवड शहरातील अनधिकृत बांधकाम नियमित करण्यासाठी तत्कालीन आघाडी सरकारने लादलेली शास्तीकर माफीच्या निर्णयाला एक वर्ष पूर्ण झाले. या कालावधीत महापालिकेच्या तिजोरीत मूळकरापोटी तब्बल १५२ कोटी हून अधिक रक्कमेचा भरणा झाला आहे. राज्यातील तत्कालीन आघाडी सरकारने पिंपरी-चिंचवडमधील गुंठा-दीड गुंठा जागा घेवून सर्वसामान्य नागरिकांनी बांधलेली घरे अनधिकृत ठरवली होती. या घरांना नियमित करण्यासाठी २००८ साली शास्तीकर लागू करण्यात आला. शास्तीकर मूळकरापेक्षा जास्त असल्यामुळे त्याचा भरणा करण्यात मिळकतधारकांनी उदासीनता दाखवली होती. त्यामुळे शास्तीकराची थकबाकी तब्बल ८५० कोटींहून अधिक झाली होती. त्यामुळे, महापालिकेच्या आर्थिक प्रगतीवर परिणाम होत होता. यापार्श्वभूमीवर आमदार महेश लांडगे यांनी २०१४ पासून शास्तीकर सरसकट माफ करण्याबाबत पाठपुरावा सुरू केला होता. २०१७ मध्ये महापालिकेत भारतीय जनता पार्टीची सत्ता आली. त्यानंतर शास्तीकर माफ होईल, अशी अशा होती. तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही शास्तीकर माफीचे आश्वासन दिले होते. मात्र, २०१९ मध्ये राज्यात सत्ता बदल झाला.

# महापालिकेची आप्रेंटेशिप प्रशिक्षणार्थी यादी जाहीर

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।** पालिकेच्या वतीने अस्थायी अस्थापनेवर शिकाऊ उमेदवार म्हणून १ वर्ष कालावधी करीता सन २०२३-२४ साठी व्यवसाय निहाय शिकाऊ उमेदवार प्रशिक्षणार्थ्यांची यादी जाहीर केली आहे. प्रशिक्षणार्थ्यांच्या यादी सोबतच महापालिकेने प्रशिक्षणार्थ्यांचे नेमणूक आदेश व प्रतिक्षा यादी महानगरपालिकेच्या या अधिकृत संकेतस्थळावर (मुख्य पृष्ठ – आमच्याबद्दल – नोकरीविषयक – शिकाऊ उमेदवार नेमणूक सन २०२३-२४ प्रशिक्षणार्थी नेमणूक आदेश ) पिंपरी चिंचवड मनपाच्या औद्योगिक प्रशिक्षण विभागामार्फत आज रोजी प्रसिध्द करण्यात आला आहे. निवड झालेल्या शिकाऊ उमेदवारांना या नेमणूक आदेश दिनांकाच्या १० दिवसाच्या आत, नियुक्ती प्राधिकारी प्राचार्य औद्योगिक प्रशिक्षण विभाग, मोरवाडी यांच्या कार्यालयात पुढील कार्यवाहीसाठी कार्यालयीन वेळेत उपस्थित राहणे बंधनकारक करण्यात आले आहे.

# भाजपाच्या या गळचेपीला जनता येणाऱ्या निवडणुकीत उत्तर देईल

## राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शहराध्यक्ष तुषार कामठे

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्सप्रेस मराठी।** पिंपरी - चिंचवड शहरातील महाविकास आघाडी वघटक पक्षांच्या माध्यमातून लाखो लोकांचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या १४१ खासदारांच्या निलंबनाबाबत निषेध नोंदवण्यासाठी आंदोलन करण्यात आले. हे आंदोलन डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक, पिंपरी येथे पार पडले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शहराध्यक्ष तुषार कामठे




म्हणाले की भाजपाच्या या गळचेपीला जनता येणाऱ्या निवडणुकीत उत्तर देईल. यावेळी कार्याध्यक्ष देवेंद्र तायडे, समाजसेवक मारुती भापकर, सामाजिक कार्यकर्ते मानव कांबळे,राजेंद्र नायर, माजी नगरसेवक गणेश भोंडवे, शहराध्यक्ष चेतन बेंद्रे,मुख्य प्रवक्ते माधव पाटील, ओबीसी अध्यक्ष विशाल जाधव,महिला अध्यक्षा ज्योती निंबाळकर, विजयकुमार पिरंगुटे, राहुल आहेर, विनोद धुमाळ ज्योती जाधव,जनाबाई जाधव, राजेश हरगुडे, योगेश सोनवणे,गणेश काळे, राजू खंडागळे,स्वप्नाली असोले आदी उपस्थित होते.

# 'एक दिवस शाळेसाठी' उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

## सहा हजार ६१५ विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्सप्रेस मराठी।** पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयाच्या वाहतूक शाखेमार्फत सुरू केलेल्या 'एक दिवस शाळेसाठी' या उपक्रमांतर्गत गुरुवारी (ता. २१) विविध शाळेतील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. वाहतूक शाखेच्या वीस पथकाच्या माध्यमातून दर गुरुवारी वीस शाळांमध्ये जाऊन विद्यार्थ्यांमध्ये रस्ते सुरक्षा, व्यसन न करणे, महिला सुरक्षा व सायबर सुरक्षा या विषयावर मार्गदर्शन करण्यात येते. गुरुवारी तिसऱ्या टप्प्यात सहा




हजार ६१५ विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. या उपक्रमात पोलिस आयुक्त विनयकुमार चौबे, अतिरिक्त पोलिस आयुक्त वसंत परदेशी, डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. एन. जे. पवार, पोलिस उपायुक्त बापू बांगर, विद्यापीठाचे रजिस्ट्रार नरेंद्र कडू यांनी पिंपरीतील डॉ. डी. वाय. पाटील महाविद्यालयात उपस्थिती लावली. या वेळी विद्यार्थ्यांना पंतप्रधान नरेंद्र मोदी लिखित एक्झाम वॉरिअर्स या पुस्तकाचे वाटप करण्यात आले. या उपक्रमांतर्गत आतापर्यंत साठ शाळांतील १८ हजार ९९१ विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले आहे.

# चाचण्या वाढविण्याचे सावंतांचे निर्देश

## वाढत्या कोरोनाच्या पार्श्वभूमीवर आरोग्य विभाग सतर्क

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।** राज्यात कोरोनाच्या या नवीन व्हेरियंटचे रुग्ण आढळले असले तरी नागरिकांनी घाबरुन न जाण्याचं आवाहन केलं आहे. तसेच कोविडशी संबंधित सर्व नियमांचे योग्य रितीने पाल करण्याचे आवाहन देखील आरोग्य मंत्री तानाजी सांवत यांनी केलंय. 'गछ१' साठी आरोग्य यंत्रणा सज्ज असून, संशयित रुग्णांच्या चाचण्या वाढविण्याचे, त्यांचे सर्व क्षण अधिक सक्षम करण्याचे आणि त्यांच्यावर आवश्यक ते उपचार करण्याचे निर्दे शही तानाजी सांवत यांनी दिलेत. 'गछ१' या नवीन व्हेरियंटच्या वाढत्या रुग्णसंख्येच्या पार्श्वभूमीवर तानाजी सावंत यांनी आरोग्य विभागाच्या तयारीचा गुरुवार २२ डिसेंबर रोजी आढावा घेतला. आरोग्य विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, आयुक्त तथा राष्ट्रीय आरोग्य अभियानचे संचालक धीरज कुमार, सर्व जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, महापालिकांचे आयुक्त, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्यचिकित्सक तसेच आरोग्य विभागाचे सर्व प्रमुख अधिकारी या



बैठकीला दूरदृष्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

यावेळी तानाजी सावंतांनी म्हटलं की, जिल्हास्तरावर रुग्णालयांतील यंत्रणेचे गांभीर्याने मॉकड्रिल करून तीन दिवसांत याविषयीचा अहवाल सादर करावा. 'गछ१' हा व्हेरियंट धोकादायक नसला तरी आरोग्य विभागातील अधिकाऱ्यांनी सर्व तयारीनिशी सतर्क राहावे. नागरिकांमध्ये अफवा पसरून भीतीचे वातावरण निर्माण होणार नाही याची काळजी जिल्हास्तरापासून घेण्यात यावी. यासाठी नागरिकांमध्ये जागरुकता निर्माण करावी. हलगर्जीपणा न करता आरोग्य यंत्रणा, विलागीकरण कक्ष, ऑक्सिजनची सुविधा, अतिदक्षता विभाग, व्हेंटीलेटर आणि महत्त्वाची उपकरणे कार्यरत आहेत की नाही याची प्रत्यक्ष जाऊन तपासणी करावी आणि त्याबाबतचे व्हिडिओ तयार करून राज्यस्तरावरील वरिष्ठ अधिकाऱ्यांना पाठवावेत. प्रत्येक जिल्ह्यात संशयित रुग्णांच्या चाचण्यांची संख्या वाढविण्याची गरज असून चाचणी, सर्वेक्षण आणि उपचार या त्रिसूत्रीचा अवलंब करावा, अशी सूचना देखील तानाजी सावंतांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिलेत. नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी समाजमाध्यमांसह जिल्हा रुग्णालय, आपला दवाखाना येथे फलक लावण्यात यावेत. त्याचप्रमाणे नागरिकांमध्ये चुकीची माहिती पसरू नये यासाठी माध्यमांना माहिती देण्यासाठी एका नोडल अधिकाऱ्याची नियुक्ती करावी. या अधिकाऱ्या मार्फतच याविषयीची अधिकृत माहिती देण्यात यावी. जेणेकरून अफवा आणि चुकीची माहिती प्रसारित होणार नाही. प्रसार माध्यमांनीही याविषयीचे वृत्त देताना वस्तुस्थितीची पडताळणी करावी आणि नागरिकांमध्ये विनाकारण भीती पसरेल अशी चुकीची माहिती प्रसारित करू नये, असे आवाहन त्यांनी केले आहे . एक आठवड्यात मूल्यमापन करून टास्क फोर्स बाबत निर्णय घेण्यात येईल असही तानाजी सावंतांनी म्हटलं. आरोग्यमंत्री सावंत यांनी राज्यातील वैद्यकीय व्यवस्थेच्या तयारीचा आढावा घेतला. यानंतर पत्रकार परिषदेत ते बोलत होते. ते म्हणाले की, राज्यातील आरोग्य व्यवस्थेच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी आज बैठक झाली. केरळमध्ये जेएन.१ आढळून आल्यानंतर लगेचच आम्ही मॉक ड्रीलचे नियोजन केले होते. त्यानुसार १७ व १८ डिसेंबरला राज्यभरात आरोग्य व्यवस्थांचे मॉक ड्रील झाले. त्यात आरोग्य व्यवस्थेची सज्जता, साधनसामग्री, रुग्णालयातील खाटा यासह इतर बाबींचा आढावा घेण्यात आला. याचबरोबर पूर्वतयारीची पावले उचलण्याचे निर्दे श देण्यात आले आहेत. राज्यात करोनाचा उपप्रकार जेएन.१चा आतापर्यंत एक रुग्ण आढळून आला आहे. या रुग्णाची लक्षणे आणि जेएन.१ उपप्रकाराबाबत इतर बाबी तपासल्या जात आहेत. याबाबत पुढील ४८ तासांत सरकारला अहवाल मिळेल. त्यानंतर हा उपप्रकार किती धोकादायक आहे, हे स्पष्ट होईल, असे आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांनी शुक्रवारी सांगितले. याचबरोबर करोनाच्या वाढलेल्या धोक्याच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारला मार्गदर्शन करण्यासाठी विशेष कृती पथकाची स्थापना करण्याची घोषणाही त्यांनी केली.

### उपप्रकार धोकादायक नसून सौम्य

**» राज्यात सिंधुदुर्गमध्ये जेएन.१ चा एकमेव रुग्ण सापडला आहे. त्याला कुठून संसर्ग झाला याची तपासणी केली जात आहे. त्यांच्या संपर्कात आलेल्या व्यक्तींची तपासणी केली जात आहे. या रुग्णाची लक्षणे आणि इतर बाबींवर आम्ही लक्ष ठेवून आहोत. त्याचा अहवाल ४८ तासांत सरकारला मिळेल. हा अहवाल मिळाल्यानंतर हा उपप्रकार किती धोकादायक आहे, हे स्पष्ट होईल. सध्या करोनाचा संसर्ग वाढत असता तरी तो घातक स्वरुपाचा नाही, असे सावंत यांनी स्पष्ट केले. उपप्रकार पहिल्यांदा केरळमध्ये आढळून आला. केरळमधील अहवाल आम्हाला मिळाला आहे. तिथे मृत्यू झालेल्या तीन रुग्णांपैकी दोघांना इतर आजार होते. तसेच त्यांचा वयोगट ७५ वर्षांपुढील होता. हा उपप्रकार धोकादायक नसून सौम्य असल्याचे प्रथमदर्शनी दिसत आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.**

# विजयस्तंभ अभिवादन सोहळ्यासाठी प्रशासन सज्ज

## सर्व सुविधा प्रशासनातर्फे उपलब्ध करून देण्याची पूर्वतयारी

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।** पेरणे फाटा येथे १ जानेवारी रोजी आयोजित करण्यात आलेला विजयस्तंभ अभिवादन सोहळा शांतता आणि उत्साहात साजरा व्हावा, यासाठी आवश्यक सर्व सुविधा प्रशासनातर्फे उपलब्ध करून देण्याची पूर्वतयारी करण्यात आली असून सोहळ्याच्या नियोजनासाठी प्रशासन सज्ज आहे, असं जिल्हाधिकारी डॉ.राजेश देशमुख यांनी सांगितलं आहे. डॉ. देशमुख म्हणाले, दरवर्षी साजरा होणारा विजयस्तंभ अभिवादन सोहळा हा महत्वाचा आणि भावनिक कार्यक्रम आहे. यावर्षी अधिक अनुयायी येण्याचे गृहीत धरून सूक्ष्म नियोजन करण्यात आले असून शासनातर्फे समिती गठीत केली आहे. २१० एकरात ३३ ठिकाणी वाहनतळाची व्यवस्था, पीएमपीएल बसेससाठी ४ ठिकाणी थांब्याची सोय, राखीव



वाहनतळ, वीज, आकर्षक रोषणाई, बुक स्टॉल, शुद्ध पाण्याची व्यवस्थेसाठी १५० टँकर्स, फिरते शौचालय, आरोग्य सेवेसाठी १५ पथके, २५९ वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी, ५० रुग्णवाहिका, २७ जनरेटर सेट, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाच्या पथकासोबत स्वयंसेवक बोटी इत्यादी आवश्यक सुविधा पुरविण्यात येणार आहेत. कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी ४ हजार पोलीस अधिकारी, कर्मचारी तैनात करण्यात येणार आहेत. ३१ डिसेंबर रोजी ४७५ पीएमपीएल बसेस तर १ जानेवारी २०२४ रोजी ५७५ पीएमपीएल बसेसचे नियोजन केले आहे. प्रत्येक बसवर दोन कर्मचारी, राखीव चालक, यांची नेमणूक करण्यात आली आहे. पुणे पोलीस विभागाकडून पुणे-नगर महामार्गावरील वाहतूक वळविण्याचे आदेश जारी केले आहेत. वाहतूकीतील बदलांविषयी नागरिकांना पूर्वसूचना देण्यात येईल. सर्व अनुयायांना कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये, म्हणून प्रशासन योग्य ती दक्षता घेत आहे.

# गोखले इन्स्टिट्यूटचा अहवाल मराठा आरक्षण मिळवून देणार का?

## आरक्षण सर्वेक्षणाची जबाबदरी गोखले संस्थेला देण्याचा निर्णय

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** मराठा आरक्षणासाठी सर्वेक्षण करण्याची जबाबदरी राज्य मागासवर्ग आयोगाकडून पुण्यातील गोखले राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र संस्थेला देण्याचा निर्णय घेण्यात आलाय. गोखले इन्स्टिट्यूट कडून मराठा समाजाच सर्वेक्षण करण्यासाठी १५४ प्रश्नांची प्रश्नावली तयार करण्यात आलीय . या प्रश्नावलीचा उपयोग करून संगणकीय प्रणाली आणि मोबाईल एपच्या आधारे मराठा समाजाची माहिती गोळा करण्यात येणार आहे. मात्र आरक्षणासाठीचे निकष सिद्ध करण्यासाठी सर्वंकष माहिती असलेला इंपीरीकल डेटा गोळा करणे आवश्यक असताना गोखले इन्स्टिट्यूट कडून फक्त १५दिवसांत केलं जाणारं सर्वेक्षण आणि त्याआधारे दिलं जाणारं आरक्षण न्यायालयात टिकेल का? असा प्रश्न विचारला जातोय. कारण याच गोखले इन्स्टिट्यूटच्या



एका सर्वेक्षणाचा आधार घेऊन न्यायमूर्ती गायकवाड आयोगाने तयार केलेला अहवाल आणि त्या आधारे दिलेले आरक्षण सर्वोच्च न्यायालयात टिकले नव्हते. महाराष्ट्राच राजकारण आणि समाजकारण सध्या आरक्षण या एकाच विषयाने व्यापून गेलंय. आणि या ज्वलंत विषयाच्या केंद्रस्थानी असणार आहे. पुण्यातील गोखले इन्स्टिट्यूट कारण याच गोखले इन्स्टिट्यूट कडे मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी करायच्या सर्वेक्षणाची प्रश्नावली तयार करण्याची जबाबदरी सोपविण्यात आलीय. गोखले इन्स्टिट्यूट कडून त्यासाठी १५४ प्रश्नांची प्रश्नावली तयार करण्यात आलीय . या १५४ प्रश्नांच्या साहाय्याने मराठा समाजातील कुटुंबांची सामाजिक , शैक्षणिक, आर्थिक आणि राजकीय माहिती गोळा केली जाणार आहे . त्या कुटुंबाचा पारंपरिक व्यवसाय , सध्या असलेलं उपजीविकेचं साधन, घराचे क्षेत्रफळ , शेती , घरातील लोकांसाठी रस्ता , वीज, पाणी , शॉचालय यासारख्या सुविधा आहेत का ? घरात लोकप्रतिनिधी आहेत का ? घरात कोणाला सरकारी नोकरी आहे का ? पूर्वजांचे मूळ निवास्थान आणि कुटुंबाचा महाराष्ट्रातील निवासाचा कुटुंबाचा कालावधी यासारखे १५४ प्रश्न विचारले जाणार आहेत. गोखले इन्स्टिट्यूटला हे काम अवघ्या १५ दिवसांत पूर्ण करावं लागणार आहे . कारण फेब्रुवारी महिन्यात राज्य सरकारकडून बोलावण्यात येणाऱ्या विशेष अधिवेशनाच्या आधी हे सर्वेक्षण पूर्ण करून राज्य मागासवर्ग आयोगाला अहवाल तयार करावा लागणार आहे . या कामासाठी पंधराशे कर्मचाऱ्यांचा उपयोग करून घेण्यात येणार असून १५४ प्रश्नांची प्रश्नावली संगणकीय प्रणाली आणि मोबाईल एप्सच्या माध्यमातून भरून घेतली जाणार आहे. त्यासाठी केंद्र सरकारने २०११ साली केलेल्या जनगणनेच्या माहितीचा उपयोग केला जाणार आहे . मात्र गोखले इन्स्टिट्यूट कडून केलं जाणारं सर्वेक्षण आणि त्या आधारे दिलं जाणारं आरक्षण न्यायालयात टिकेल का? असा प्रश्न महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडून विचारण्यात आलाय . एखाद्या समाजाचे मागासलेपण सिद्ध करण्यासाठी सर्वंकष माहिती असलेला इंपीरीकल डेटा गोळा करणे आवश्यक असताना गोखले इन्स्टिट्यूट कडून अल्पावधीत केलं जाणारं सर्वेक्षण कामचलाऊ ठरण्याची भिती आहे. कारण याच गोखले इन्स्टिट्यूटच्या एका अहवालाचा आधार न्यायमूर्ती गायकवाड आयोगाने घेतला होता आणि त्या आधारे दिलेले आरक्षण सर्वोच्च न्यायालयात टिकले नव्हते. याच मुद्द्यावर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडून गोखले अर्थशास्त्र संस्थेला मराठा आरक्षणासाठी सर्वेक्षणाचे काम सोपविण्यास विरोध करण्यात आलाय. लवकरच मनसे अध्यक्ष राज ठाकरे देखील याबाबत भुमिका मांडणार असल्याच मनसे नेत्यांनी स्पष्ट केलंय. गोखले इन्स्टिट्यूट बाबत शंका घेणं बरोबर ठरणार नाही, असं सत्ताधारी नेत्यांचं म्हणणंय . मराठा समाजाला आरक्षण देण्याची सरकारची प्रामाणिक इच्छा असल्यानं काही अडचण येणार नाही असा दावा करण्यात येतोय .

### ऑनलाईन पद्धतीनं सर्वेक्षण

**» भारतात पहिली जनगणना झाली ती १९९१ साली, पण ज्या जनगणनेला सर्वंकष जातनिहाय जनगणना मानलं गेलं ती जनगणना इंग्रजांनी केली १९३१ साली. त्या जनगणनेच काम संपूर्ण हिंदुस्थानात सात ते आठ वर्षं सुरु होतं. ब्रिटिशांच्या ताब्यातील महसूल यंत्रणेतील अधिकाऱ्यांनी त्यासाठी गावोगावी प्रत्यक्ष जाऊन माहिती गोळा केली. याच माहितीच्या आधारे पुढे भारतात आरक्षणाच धोरण निश्चित करण्यात आलं . त्या तुलनेत अवघ्या १५ दिवसांत गोखले इन्स्टिट्यूट कडून ऑनलाईन पद्धतीनं सर्वेक्षण केलं जाणार आहे आणि म्हणूनच याबद्दल शंका घेतली जातेय.**

# राष्ट्रवादी कॉंग्रेसचे आ. रोहित पवारांचं फेसबुक अकाऊंट हॅक

## फेसबुक प्रोफाईल फोटोलो सिया राजपूत हे नाव

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** राष्ट्रवादी कॉंग्रेसचे आमदार रोहित पवार यांचं फेसबुक अकाऊंट पुन्हा एकदा हॅक झालेय. रोहित पवार यांनी ट्वीट करत याबाबतची माहिती दिली आहे. रोहित पवार यांच्या फेसबुक प्रोफाईल फोटोला सिया राजपूत हे नाव दाखवत आहे. तर फेसबुकला सिया राजपूत असं नाव दाखवत आहे. रोहित पवार सोशल मीडियावर चांगले ॲक्टिव्ह असलेले पाहायला मिळतात. मागील काही दिवसांपासून त्यांची सोशल मीडिया खाती हॅक होत असल्याचे समोर आलेय. रोहित पवार यांनी ट्वीट करत याबाबत संताप व्यक्त केलाय. त्याशिवाय रिकव्हरीसाठी प्रयत्न सुरु आहेत, असे



रोहित पवार यांनी आपल्या ट्वीटमध्ये म्हटलेय. दरम्यान, रोहित पवार यांना फेसबुक पेजवर पाच लाखांपेक्षा जास्त फॉलोवर्स आहेत. गेल्या काही दिवसांपासून माझे सोशल मिडियावरील अकाऊंट हॅक होण्याचे प्रकार सुरु आहेत. आज माझं अधिकृत फेसबुक पेज हॅक झालं आहे. या पेजवर चुकीचा मजकुर दिसून येत असून, कृपया याकडे दुर्लक्ष करावं, असे ट्वीट करत रोहित पवार यांनी समर्थकांना मेसेज दिलाय. दरम्यान, नेमके हे पेज कुठून आणि कोणी हॅक केले याचा मात्र सुगावा अजून लागलेला नाही. पण रिकव्हरीसाठी प्रयत्न सुरु आहेत, असे रोहित पवार यांनी सांगितले आहे. रोहित पवार यांच्या फेसबुक पेजचं युआरएलही बदलण्यात आल्याचे दिसतेय. युआरएलमध्ये असे नाव दिसत आहे. रोहित पवार यांच्या फेसबुक पेजवरुन सिया रजपूत कपड्याच्या ब्रँडची जाहिरात करण्यात आल्याचे दिसतेय.